राम लक्ष्मणासहित जिथे सीतेला ठेवले होते तिथे आले निमिषमात्र त्यांनी सितेला पाहिले. पावित्र्याची मंगलमूर्तीच जणू उभी होती! रामाने तिला प्रेमाने अलिंगन दिले. सर्वांच्या नेत्रांतून अश्रु ओघळले. अनेकांचे मूक शुभचिंतन ! दोघांच्याहि ओठातील शब्द तिथेच विरले. रामाच्या स्पर्शाने सीता पवित्र झाली. सर्व जनतेने रामाच्या नावाचा जयघोष केला. राम-सीतेच्या दर्शनासाठी लंकावासी उत्सुक झाले. एका शृंगारलेल्या रथातून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. असंख्य नरनारींनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. रामाचे हृदय भरुन आले. जनतेच्या त्या प्रेमवर्षावाने त्यांचे नेत्रहि पाणावले.

बिभिषणाने त्या दोघांना आपल्या महलात नेले. तेथे त्यांना अत्यंत आदराने आसनावर बसविले. रामदर्शनाने बिभिषण तर वेडाच झाला होता. रामशिवाय आपण जिवंत राहणार नाही अशी त्यांची कल्पना होती. इतके रामाचे वेड त्याला लागले होते. अनेक दिवस तिथे राहिल्यावर बिभिषणाने आपली इच्छा बोलून दाखविली. तो म्हणाला हे कल्याणकारी श्रीरामा, आमच्या या लंकेचे राज्य आपण करावे अशी सर्वांची इच्छा आहे. आपणाला राज्यभिषेक करावा आणि आपल्या प्रेमळ छत्राखाली श्रीलंकेचे राज्यश्वर्धिष्णु व्हावे अशी नगरवासियांची इच्छा आहे.

श्रीराम म्हणाले, हे पुण्य पुरुषा, तुमची इच्छा योग्य आहे. परंतु राज्याभिषेकाचा मान पहिला भरताचा आहे. आम्ही भरताच्या देशाचे नागरीक आहोत. भरताच्या आज्ञेने आम्ही इथे आलो. ही लंकाहि भरताचीच आहे. तुमच्या श्रीरामाला राज्यलोभ कधी शिवला आहे काय? कर्तव्याचा काटेरी मुकुट त्याच्या पित्याने त्याच्या शिरी जन्मत:च ठेवला आहे. ते परम भाग्यवंत लेणे सोडून राज्यभिषेकाची इच्छा मी कशी करणार ? श्री भरतेश्वरांच्या अस्तित्वात स्वप्नात देखील राज्यभिषेकाचा विचार माझ्या मनात येणार नाही. माता कैकलयीला मी दिलेले वचन कसे मोडू? भरतेशाचे मन मला मोडता येईल पण माता कैकयीची आज्ञा म्हणजे माझ्या हृदयाचे स्पंदन आहे. माझा निश्वास आहे तिची आज्ञा ! हे कुलोत्तम बिभिषणा, सीतेची इच्छा आहे की आपलीच या लंकेच्या राज्यपदी नेमणूक करावी. या लंकेचे राज्य करायला आपणच सर्वस्वी पात्र आहात. आपणच हा कार्यभार सांभाळावा अशी आमची इच्छा आहे.

सीतेनेहि या कामी श्री बिभिषणाची समजुत काढली. आणि सर्व लंकावासीयांच्या सदिच्छेने अत्यंत मोठया प्रमाणात उत्सव करुन श्री बिभिषणाला राज्यभिषे्क करविला. श्रीरामाचे थोरपण लंकावासियांना दिसून आले. रामाने लंका जिंकली असताहि राज्यलोभ त्यांच्या मनात आला नाही. अत्यंत प्रेमादराने बिभिषणाला त्यांनी राज्यभिषेक करविला. बिभीषणालाहि त्यांच्या मनाची थोरवी पाहून भरुन आले. रामाला जेंव्हा तो नमस्कार करु लागला तेंव्हा आम्ही आता नागरिक आणि तुम्ही राजे आहात. पुण्याने प्राप्त झालेल्या या राज्यपदाचा उपभोग संयमाने आणि विवेकाने घ्या. जीवनाचे ध्येय दृष्टि आड होऊ देऊ नका. प्रजेचे हित तेच जनतेचे हित होय. परंतु याहिपेक्षा श्रेष्ठ आहे स्वत:चे जीवन. त्या जीवनाचा उध्दार करणे हे तुमचे महत्वाचे कार्य आहे. लोकाभिमूख होऊन आत्मधर्माला विसरु नये, हीच आमची इच्छा आहे.

समारंभानंतर श्रीरामाने परत अयोध्येला जाण्याचा मनोदय प्रगट केला. राम अयोध्येला परत जाणार ही वार्ता लंकेमध्ये पसरली. श्रीरामाचे आगमनाने लंकेतील लोकजिवन मंगल झाले होते. लोकजिवनाचा प्रवाह संयमित व विवेकी बनला होता. संसारातील सुखदु:खांना निर्लेप भावनेने जपत आणि जोपासत, सहन करीत राहण्याची प्रवृत्ती वाढीला लागली होती, जो भोगप्रवृत्तीचा प्रसार रावणाच्या वेळी झाला होता तो पार नष्ट झाला होता. भोगाच्या कल्पनेला सीमा नसली तरी मन व शरीर यांच्या उपभोग शक्तिला सीमा आहे. जिथे मन व शरीर यांच्यातील संतुलन नष्ट होते तिथे जीवनात वैफल्य, विकृति आणि वासनांधता येते. जीवन जगण्याची कल्पना जाऊन जीवन कंठण्याची पाळी येते. हा बदल मानवी जीवनाला पोखरतो. जीवनाचा स्वीकार ते जसे आहे तसाच केला पाहिजे. ऐहिक जीवन नश्वर आहे हे स्वीकारले पाहिजे. त्याच्या नश्वरतेतून आत्म्याची शाश्वतता जाणवली नाही तर जग अशांतीचे माहेरघर बनेल.

श्रीरामाने याच दिव्य जीवनाची देणगीं लंकावासियांना दिली. नश्वर जीवन आत्म्याच्या शाश्वरत आनंदाने जगायला शिकणारी मानव जात निर्माण केली तर हे जगच स्वर्ग बनते. शोकविव्हल लंकावासियांनी रामाला लंकेतच राहण्याचा फार आग्रह केला. काही केल्या आम्ही

आपणांस लंका सोडून जाऊ देणार नाही. असा हट्ट लोकांनी घेतला. त्यामुळे आणखी काही दिवस राहण्याचा मानस श्रीरामाने व्यक्त केला.

तिकडे अयोध्येत राम-लक्ष्मणाचे काय झाले याचा पत्ताहि नव्हता. राणी कौसल्या आणि सुमित्रा या पुत्रांच्या वियोगाने कृण झाल्या होत्या. लक्ष्मणाला रावणाची शक्ती बांधल्याचा वृत्तांत तेवढा काय तो त्यांना कळाला होता. पुढे या महाभंयकर युध्दात मुलांचे काय झाले हे न समजल्यामुळें आईच्या मनास दु:ख होणे हेकेवळ अपरिहार्यच होते. ज्यांना पति नाही अशा स्त्रियांचा अनंवस्त्रोत म्हणजे मुलेच होत. त्यांचाहि आधार नाही या कल्पनेनेच स्त्रियांना मरणप्राप्त दु:ख होते. मुले मोठी झाली म्हणजे त्यांच्या ठिकाणची वाढती उम्मेद व माता-पितरांचे असाहय वृध्दत्व यांचे गणित जमनासे होते.

एके दिवशी कौसल्या व सुमित्रा अत्यंत उदास आणि विमनस्क स्थितीत असता श्री नारदमुनी आकाशमार्गातून विहार करीत असता तेथे आले. श्री नारदाचे अचानक आगमन पाहून दोघांच्या मनात एकदम यानी काहीतरी अशुभ वार्ता आणलि की काय असे विचार निर्माण झाले त्यामुळे त्यांचे चेहरे अगदीच पांढरे दिसू लागले. भीति आणि चिंता हेच मानवी जीवनाचे शत्रु आहेत. अतिस्नेहामुळे प्रिय व्यक्तीची खुशाली कळाली नाही तर नको तो वाईट विचार मनांत येतात आणि मग आणखीनच दुबळे बनते.

नारदांनी सौम्य शब्दांत विचारले,

कुशल तर आहे ना सगळे? तुमचे चेहरे असे म्लान कां दिसत आहेत?

तेंव्हा कौसल्येने उत्तर दिले- महाराज, आपले आगमन शुभसूचक आहे, असे आम्ही समजतो. परंतु आपण बऱ्याच वर्षांनी आला असल्याने इकडे अयोध्येवर काय प्रसंग गुदरला हे आपणांस ज्ञात झाले नाही असे दिसते.

नारदाला रामवनवासाची, दशरथ राजाने घेतलेल्या संन्यासाची आणि राम-रावणाचे युध्द चालू असल्याची वार्ता कौसल्या मातेने अत्यंत हृदयद्रावक रीतीने सांगितनी. नारदाने हृदय द्रवले. त्यांच्याहि नेत्रातून अश्रुपूर वाहू लागला. श्रीरामासारख्या सत्शिल व्यक्तीवर हा प्रसंग यावा ना ! पण नियतीचा हा नियमच असावा की थोर आत्म्याच्या आहुती शिवाय जगाला शहाणपण शिकता येत नाही. एका बलिदानाने निर्माण झालेली मानवीमूल्ये शेकडो कायद्यांनी निर्माण केली तरी पुसली जात नाहीत. किंवा अंगवळणीहि पडत नाहीत. रामाचा वनवास हा कुणाला शाप वाटेल तर कांहिना मानवजातीला दिलेले वरदान वाटेल. राम ही व्यक्ति नाही तर एका महान तत्वाची अभिव्यक्ति आहे. आणि अशी अभिव्यक्ति अग्निपरीक्षेशिवाय तग धरु शकत नाही.

कौसल्येकडून सर्व वृत्तांत ऐकून घेऊन नारद म्हणाले, माता, तुम्ही शोक करु नका. मी आत्ताच लंकेला जातो आणि श्रीरामाचे काय अवस्था आहे हे पाहून येतो. तुम्ही शांत रहा. शोकाने जीवनरसाचा ओघ जळून जातो. चैतन्याला काळ्वंडूनटाकणारा शोक आणि पश्चाताप आपण सोडून द्यावा.

असे म्हणून नारदांनी आकाशांत उड्डाण केले. आणि ते दक्षिणेकडे जायला निघाले.

नारद महर्षी आकाशमार्गाने जायला निघाले. जेंव्हा ते लंकेत आले तेंव्हा एका सरोवरात शेकडो तरुण-तरुणी स्नान करीत असताना त्यांनी पाहिले. नेत्रांनी सुखविणारे ते विलोभनिय दृश्य ते पाहतच राहिले. शेकडो तऱ्हेच्या वृक्षांच्या त्या दाट
झाडीत लपलेले ते अत्यंत मनोहर सरोवर म्हणजे स्वर्गातील इंद्राच्या सरोवराची प्रतिकृतीच होती की काय असे वाटत होते. सरोवरावर हेलावणाऱ्या मनोहर लाटांनी मानवी मन कितीहि शोकाकुल, असले तरी काही काळ मन रिझविणारे होते.

नारदांनी जेंव्हा कुणा एका अपरिचिताकडे रावणाचे क्षेत्र आहे ना अशी पृच्छा केली तेंव्हा तर सारी मंडळी खो खो करीत हसत सुटली. त्यांच्या चेहऱ्यावर चेष्टेचा आनंद ओसंडत

होता.  नारदाला हे काहीच कळेना.  शेवटी एका सैनिकाने नारदाला शत्रु पक्षाचा समजुन रामापुढे उभा केला.  नारदांना पाहताच श्रीराम उठून त्यांचा विनय केला.  सैनिकाच्या चुकीबद्दल क्षमा मागितली.

त्यानंतर श्री रामाने नारदाला कुशल प्रश्न विचारला.  नारद म्हणाले,   श्री रामा, मी अयोध्येवरुन येत आहे.  तेथे तुमची माता कौसल्या आणि सुमित्रा तुमच्या आगमनाची प्रतिक्षा करीत आहेत आणि तुम्ही मात्र खुशाल इथे सुखोपभोगात व आनंदात मग्न आहात!  त्या म्हणत होत्या लंकेत श्रीरामाचे व रावणाचे युध्द पेटले आहे आणि लक्ष्मणाला शक्ति लागलेली आहे पण इथे तर तुम्ही सारे आनंदात आहात!  सीतामाईला देखील लंका फारच मानवलेली दिसत आहे.

सीतेने लाजेने मान खाली घातली.

श्री लक्ष्मण म्हणाले,   नारद महर्षी आम्ही क्षत्रिय कुलांतील राजपुत्र!  युध्द करुन असत् प्रवृत्तींचा नाश करुन लोकजीवन सुसहय बनविणे हाच आमचा धर्म.  मातेश्वरी कैकयी यांच्या आज्ञेने आम्ही वनवास पत्करला पण इथेहि आम्हांला क्षात्र-धर्माचे पालन करण्याचा प्रसंग उदभवला आपणांस हे माहित नसेल की ज्या रावणाचे आपण मित्र होता त्या रावणाचे वसतिस्थान आता लंकेत नसून स्वर्गात आहे.

लक्ष्मणाच्या या विनोदाचे नारदाला आश्चर्य वाटले.   रावणासारख्या अतिबलाढय महासम्राटाला या छोटया राजपुत्रांनी यमसदनाला पाठविले हे ऐकून नारदांनी खरोखरच दोघांची फार स्तुती केली.

बिभिषणाने सर्व हकीकत नारदाला सांगितली.  श्रीरामाचे अतुलनीय धैर्य व धर्ममार्गावरील विश्वास आणि श्री लक्ष्मणाचा अतिमानवी पराक्रम याची बिभिषणाने नारदाला कल्पना दिली.  नारदाला मनोमन खूप आनंद झाला.  ते म्हणाले,   बिभिषणा, आता त्यांना

आपआपल्या घरी जाऊ दे. त्यांच्या माता पुत्रवियोगानें अत्यंत दु:खी आहेत. मी आजच जाऊन त्यांना सर्व समाचार सांगतो म्हणजे त्यांचा शोक कमी होईल.

बिभिषणाने नारदाचा यथोचित सत्कार केला व मग त्यांना जाण्याची परवानगी दिली. नारद बेहद्द खुष दिसत होते. आकाशमार्गाने ते अयोध्येस रवाना झाले.

राम अयोध्येस जाणार म्हणून बिभिषणाने पुष्पक विमान तयार करविले. फुलांच्या माळांनी ते शृंगारिले. प्रवासांत लागणाऱ्या सर्व गोष्टींची सोय त्यात केली. विमान निघणार म्हणून लक्षावधि लंकावासी तेथे जमले होते. त्यांच्या नेत्रांतून अश्रु ओघळत होते. बिभीषणाने रामाच्या चरणाला वंदन केले. श्रीरामाने त्याला आपल्या छातीशी घट्ट धरले. रामाचेहि नेत्र पाणावले. इष्ट संयोगानें आनंद आणि वियोगाने दु:ख ही मानवी मनाची प्रक्रियाच होय. श्री रामाने म्हटले, मित्रा, आपण राजे आहोत या भावनेने केलेले राज्य म्हणजे नरक! लोकसेवक बनून केलेले राज्य म्हणजेच स्वर्ग! परंतु हेहि लक्षात ठेव की साऱ्यांना, सदासर्वकाळ खुष ठेवणे हाहि राजधर्म नाही. जे जे धर्म्य आणि हितकारक ते ते आचरावे. तिथे लोकानुरंजन नसावे. सामान्य जनांचा अनुनय करण्यांत राजधर्माचा लोप होतो. आपण सूज्ञ आहांत. परंतु मित्र या नात्याने मी हे सांगत आहे. आपणास अयोध्येचे आमंत्रण आम्ही द्यावे असे नाही. परंतु उत्तरेकडेही आपले प्रियजन अयोध्येस आहेत हे मनी बाळगावे.

रामाने सर्वांना मंगल आशिर्वाद दिला व ते विमानांत बसले. पुष्पक विमान थोडयाच अवधीत आकाशांत उडू लागले. लंका दूर राहिली. वनवासाचा भोग ही आता कथा राहिली. सर्वजण मजेत हास्यविनोद करीत अयोध्येकडे जात होते. मार्गात श्रीरामानें सीतेला प्रत्येक जागेची माहिती दिली. पर्वतमाला, नद्या, सरोवरे आणि भयानक जंगले पाहून सीतेला मोठी मौज वाटली. याच मार्गांने अनवाणी प्रवास करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आलेला होता. अनेक सुखदु:खे त्यांनी अनुभवलेली होती. आज मात्र वेगळा प्रसंग होता. जीवनाच्या या वैचित्र्याबद्दल राम सीतेला सांगत होते-सीते, जीवन हे असे आहे. पूर्वजन्मी जे आपण शुभाशुभ कर्म करतो त्याची फळे प्रत्येकाला भोगावी लागतात. एखाद्या ओल्या वस्त्रावर धुळ येऊन बसावी त्याप्रमाणे विकासवस्थेत कर्माचे परमाणु आत्म्याशी बाद होतात. व त्याचाच परिपाक म्हणजे हे कर्मबध्द

जीवन आहे. ज्याला आपण सुख म्हणतो तीहि कर्माचीच फळे होत. एखाद्या चोराला सोन्याची बेडी घालावी म्हणजे जसा त्याचा सन्मान होत नाही किंवा दु:ख कमी होत नाही तसेच आपलेहि आहे. आज मिळणारे वैभव, सुख, सपंत्ती, हे देखील सोनेरी बेडयासारखेच होत.

सीतेला हे नवीन नव्हते. श्रीरामाच्या विचाराशी ती एकरुप झालेली होती. राजा जनकाचीच ती कन्या! अध्यात्ममहर्षी असलेल्याचीच ती मुलगी! जीवनाशी प्रामाणिक राहूनच ती जगत होती. जीवनाचे सत्य स्वरुप तिला माहित होते. वनवासाच्या निमित्ताने ते सत्य अधिक जवळून तिला पाहता आले. श्रीरामाच्या मुखारविदातून निघणारे तत्वज्ञान अमृताप्रमाणे जीवनसंबर्धक होते.

रामाचे आगमन होणार म्हणून अयोध्या एखाद्या नववधुप्रमाणे सजली होती. भरतेश्वराने जातीने अनंदोसत्सवाची तयारी पाहिली होती. रस्तोरस्ती रंगीबेरंगी फुलांचे सडे पडले होते. रांगोळ्या काढ त्या होत्या. घरोघरी तोरणे-पताका बांधल्या गेल्या होत्या. लहान बालकांना मिष्ट ान्नांचे वाट प चालू होते. सर्वत्र आनंदीआनंद पसरला होता.

सर्योदयानंतर तीन घट कांनी पुष्पक विमान अयोध्येकडे निघाले. घट काभरांत राम आले, राम आले या एकाच निनादाने अयोध्या नगरी दुमदुमली. श्री भरताने स्वत: रामाचे स्वागत केले. कौसल्येने रामाचे मुख चुंबिले व हृदयाशी घट्ट धरले. परंतु रामाची नजर कैकयीमातेचा शोध घेत होती. कैकयीवरील प्रेमाने राम खरोखरच वेडावत. कैकयी दिसताच कौसल्येच्या मिठीतून ते निसट ले व त्यांनी कैकयीचे पाय धरले, कैकयीने देखील माझा राम सुखरुप परतला असे म्हणत त्याला हृदयाशी धरले. दोघांच्या नेत्रांतून पाणी वाहू लागले. कैकयी म्हणाली, श्रीरामा, मला क्षमा कर, मी तुला फार दु:ख दिले.

आई, असे कसे म्हणतेस ? माता दु:ख देईल असे या पृथ्वीवर तरी घडू नये. जे घडते ते चांगल्यासाठीच ! रावणासारख्या पराक्रमी राजावर विजय मिळ्वून कीर्ति संपादणे केवळ तुझ यामुळे शक्य झाले. अयोध्येचा लौकिक त्रिखंडात गाजला तो तुझ्या आशीर्वादाने ! सर्व

वनवासांत माझ्या ह्रदयांत फक्त तुझी आठवण होती.  तुझे मंगल वरदहस्त माझ्या शिरी होते म्हणूनच आम्ही परत सुखरुप आलो.  पहा तर खरे, किती विद्याधर राजे तुझ्या सेवेला उभे आहेत.  इतके मोठेमोठे मित्र मला लाभले आहेत ते
तुझ्याच आशीर्वादाने.  तू जर हट्ट घेतला नसता तर हे शौर्य अयोध्येतच बंदिस्त झाले असते.

प्रचंड जयजयकार होत होता.  राम-लक्ष्मण-सीता यांच्या दर्शनार्थ सर्व नागरीक उपस्थित होते.  पुष्पवृष्टि होत होती.  रामाच्या ह्रदयांतील आनंद अश्रुरुपाने बाहेर प्रगट होत होता. अयोध्यावासियांच्या प्रेमाची ही परिसीमा होती.  रामाने सर्व जनतेला अभिवदन केले.  धन्य ती जनता जिला असल्या महान पुरुषांचे दर्शन घडले !

श्रीरामाच्या आगमनाने नगरीत नवा उत्साह निर्माण झाला.  भरताने रामाची भेट घेऊन त्याला विनंती केली---  हे युगश्रेष्ठा रामा, माझ्या आईच्या एका भ्रांत कल्पनेमुळे आपणाला वनवास घडला आणि हे राज्य चालविण्याची अधिक खडतर जबाबदारी माझ्या अंगावर पडली. माझा स्वभाव तुला माहितच आहे.  राज्यकारभारापेक्षां माझ्या जीवनाचा उध्दारच मला अतिप्रिय आहे.  जीवनाला श्रेष्ठत्व प्राप्त देण्यासाठी मी माझे उर्वरित आयुष्य तप:साधनेत घालवावे म्हणतो.  वैराग्याच्या भावनेने मी मनाची मशागत केली आहे.  तुम्ही सारे आता संपूर्ण समर्थ आहात.  कृपा करुन हे राजमुकूट आपण शिरी धारण करावे अशी माझी इच्छा आहे.  आपण केंव्हा येता याचीच प्रतिक्षा करीत मी काळ कंठिला राज्यभोगाच्या यातना आता पुरे झाल्या. आत्मजित होण्याच्या पुनीत मार्गाचा स्वीकार करण्याचा माझ्या विचाराला आता आपण मदत करावी.

श्रीराम म्हणाले,   भरता, वैराग्याचा मार्ग तर सर्वांनाच स्वीकारावयाचा आहे, पण अद्यापि तुझे आयुष्य सुखोपभोगाला योग्य आहे. ऐन तारुण्याच्या बहरीचा तू संन्यास घ्यावा व दिगंबर होऊन आत्मकल्याण करावे असे मला वाटत नाही.

रामा, भरत म्हणला, जीवनाचा काय भरवसा आहे? एका बहरलेल्या वृक्षावर वीज पडतांच त्याची काय अवस्था होते हे तुला कां मी सांगावे? मृत्यूचा घाला या जीवनावर केंव्हा पडेल हे कुणालाहि ठाऊक नाही, आणि सुखोपभोगासंबंधी म्हणशील तर अनंत वर्षे त्या नश्वर सुखासाठीच नाही का खर्च झाली? यज्ञात कितीहि सर्पण घातले तरी यज्ञांतील अग्नी थंड का होतो? भोग भोगून संपत नाहीत. त्यागानेच भोगाचा उपभोग घेतला तर ते संपतात. आपणा सर्वांना या भावाची विनंती आहे की, राज्योपभोगाचा आपला पुण्याधिकार आपण स्वीकारावा आणि मला मोकळे करावे.

भरताचा असा मनोदय असला तरी श्रीरामाचे मन मात्र त्या गोष्टीला अनुकुल नव्हते. परंतु भरताने आपला विचार पक्का केला आणि हळुहळु राज्यकारभार पहाण्याचे त्याने सोडून दिले.

एके दिवशी अयोध्या नगराच्या बाहेर कैवल्य अवस्थेला पोहचलेले कुलभूषण आणि देशभूषण मुनिवर्य आले. कैवलावस्थेतील या दोन महर्षिंच्या आगमनाने सारी नगरी प्रमुदित झाली. जणु वनांत वसंतऋतू आला होता. पक्षी आपल्या मधुर गायनानें वसंतश्रीची शोभा वाढवित होते. मुनींच्या दर्शनाला श्री भरतेश्वर आपल्या परिवारासह गेले. श्रीराम व लक्ष्मणहि आपआपल्या परिवारासह उपस्थित झाले. याच दोन महर्षीवरील उपसर्ग श्रीरामाने व लक्ष्मणाने वनवासाच्या वेळी दूर केला होता. त्यांच्या दर्शनाने श्रीरामाला फार आनंद वाटला. पूजा व अभिषेक करुन आपआपल्या जागी जाऊन बसले.

याच समयी श्री भरताने राज्यपदाचाच नव्हे तर सर्व प्रकारच्या व्यामोहाचा त्याग केला. अंगावरील सर्व वस्त्रदिकांचा, अलंकाराचा त्याग केला आणि णमो अरिहंताणं म्हणून-जिन-दीक्षा घेतली. नग्न दिगंबर ते झाले. त्यांच्याबरोबर अनेंक राजांनीहि जैनदिक्षेचा स्वीकार केला व ते सारे आत्मसाधनेसाठी वनांत निघून गेले.

श्रीरामाच्या मनावर या गोष्ठीचा फार मोठा परिणाम झाला. भरताच्या वियोगाने रामाचे मनहि विषण्ण झाले. अनेक दिवसपर्यंत त्यांचे मन कशातच लागेना. खाणे-पिणे रुचेना. काय करावे हेच त्यांना कळेना ! भरताचाच मार्ग जीवनाचा विकास करु शकतो हे खरे असले तरी व्यवहार म्हणून का होईना राज्यकारभार केलाच पाहिजे. तशाहि विषण्ण परिस्थितीत राज्यशकट चालू होते.

ऐक दिवशी अनेक मित्रांनी व लक्ष्मणाने रामाला राज्याभिषेकाची इच्छा बोलून दाखविली. श्रीरामाच्या मनाची तयारी नव्हती. पण केवळ जनतेच्या इच्छेविरुध्द कांही करायचे नाही म्हणून श्रीराम राज्याभिषेकाला तयार झाले.

राम-राज्यभिषेकाचा सोहळा अत्यंत थाट ाने पार पडला.

श्रीरामाच्या राज्याभिषेकाने कौसल्या मातेला फार आनंद झाला. रघुकुलाच्या परंपरेला अनुसरुनच हा उसतव झालेला होता. १४ वर्षापुर्वीच येणारा हा योग इतक्या उशीरा आला होता. मानव कितीहि मोठा असला तरी पूर्वकर्माने प्राप्त होणारी सुख:दुखे त्याला भोगावीच लागतात. त्यावाचून त्यांचीहि सुट का होत नाही. सुवर्णाचे बावन्नकशीपण हे अग्नीपरीक्षेशिवाय होत नाही. क्रोधादिक विकारांनी नित्यदुषित होणारा आत्मा हा कर्मबध्द होतो आणि वध्दावस्था त्याला या संसारातील सुखदु:खे भोगावयास लावते. श्रीरामाला मात्र या राज्याभिषेकाचे काहीच वाट ले नव्हते. त्यांना राज्यापेक्षांहि प्रजेची सेवा करण्याची संधी मिळाली याचाच आनंद झाला होता. प्रजेसाठी सुखमय व धर्ममय जीवनाची साधने उपलब्ध करुन देणे हेच राज्याचे काम. राज्यातील सर्व पदार्थावर राजाची नव्हे तर प्रजेची सत्ता असते हे श्रीरामाच्या राज्यातील मूलभूत तत्त्व होते. प्रजेसाठी स्वत: देखील राज्यत्याग करायला मागेपुढे पाहायचे नाही असे त्यांनी ठरविले होते.

सुख हेढ गाच्या आकाराप्रमाणे बदलणारे असते. सुखाचे रुपांतर दु:खात कें व्हा होईल हे सांगता येत नाही.

एके दिवशी एका परीटासंबंधीची तक्रार त्यांच्या कानी आली. एका परीटाने आपली बायको रात्रभर बाहेर राहिली म्हणून तिला मारहाण केली. तेंव्हा त्या स्त्रीने असे उत्तर दिल की सीतासारखी सुंदर स्त्री रावणाकडे सहा महिने होती पण रामाने कधी तिला दु:ख दिले नाही. किंवा मारहाण करुन हाकलून दिले नाही. मग मलाच का असे करीत आहात ?

या उत्तराने परीटाला फार संताप आला. सीतेसारख्या पवित्र स्त्रीचा असा उल्लेख त्याच्या बायकोने करावा यामुळे त्याला फार संताप आला. पण जनतेत सीतेबद्द्ल असा अविश्वास असावा आणि जनतेच्या भावना सीतेबद्दल इतक्या विकृत असाव्या यासंबंधी त्या साध्या परीटाला वाईट वाटले. ही गोष्ट रामापर्यंत पोंचू नये याची त्याने कितीही काळजी घेतली तरी ती गोष्ट रामापर्यंत गेली. श्रीरामाला अतोनात दु:ख
झाले. केवळ राज्यकर्ता म्हणूनच त्याने तो आरोप सहन केला. अन्यथा श्रीरामाच्याबद्दल असा घाणेरडा आरोप कुणी सहन केला असता?

पण काही गोष्टींवर कुणाचेच नियत्रंण नसते. त्या का घडतात याचा शोधहि घेता येत नाही. श्रीरामाने परीटाला बोलावले व त्या वार्तेची शहानिशा करुन घेतली.

परीट म्हणाला, राजाधिराज, क्षुद्र स्त्रियांचे हे उद्गार स्वत:चा अपराध लपविण्यासाठी असतात. स्त्री, बालक आणि नशेतील माणूस यांच्या शब्दावर विश्वास ठेवणे म्हणजे हवेला मुठीत धरण्यासारखे आहे. आपणांस माझी विनंती आहे की माझ्या स्त्रीच्या कटुवचनांनी आपणांस ज्या वेदना झाल्या असतील त्यासाठी मी स्वत: सुळी जायला तयार आहे. रामासाठी अयोध्यावासी काय करु शकणार नाहीत?

तुझ्याकडून मी काय करावे हे मला ऐकायचे नाही. मला फक्त मी जे ऐकले ते खरे की काय याची शहानिशा करुन घ्यायची होती. माझ्यासाठी अयोध्यावासियांचे प्राण मला नको आहेत. त्यांच्यासाठी प्राण व सर्वस्व खर्च करावेत अशी रघुकुलाची रीत आहे. आम्ही राजेपद स्वीकारले आहे ते जनतेचा कौल मानण्यासाठी! एका परीटाच्या स्त्रीच्या मनातहि जर माझ्या

हृदयाचा तुकडा असणाऱ्या परम प्रिय सीतेसंबंधी शंका असेल तर राम गर्भवती सीतेचाहि त्याग करील. अयोध्येचे राज्यपद स्वीकारणे हे कदाचित् माझ्यासाठी वरदान ठरणार नाही पण लोकांना तो एक शाप वाटेल असे मी होऊ देणार नाही. परीटा, प्रिय पत्नीला सांग की पतीच्या आज्ञेवाचून घराबाहेर राहण्यांत स्त्रीला दूषण येते व तिला ते दूषण येऊ नये म्हणून तिने पतीच्या आज्ञेत राहावे. रामाची सीता रावणाकडे होती हे खरे आहे. तिचे शुध्दीकरण न करता केवळ मोहातिरेकने मी तिला पट्टराणी केले असले तरी तिचया पतिव्रत्याची परीक्षा होईपर्यंत मी तिचा त्याग करणार आहे. अयोध्यावासियांची मने राजा आणि राणी यांच्या संबंधी अगदी स्फटिकाप्रमाणे निर्मळ राहवीत यात तीळमात्र श्ंका नाही. जा परीटा, तुझ्या स्त्रीला माझा दंडवत सांग. रामाच्या राजेपणाला कलंक लागण्यापूर्वी तिने मला सावध केले, तिचे हे उपकार मी विसरु शकत नाही. रामाने तिला गुरु मानली आहे हे सांगण्यास विसरु नकोस.

रामाचे हे सारे शब्द केवळ उद्रेकांतून बाहेर पडलेले नव्हते. त्याला क्रियाशीलतेची, विवेकाची बैठक होती. रामाचे बोल हे मोलाचे होते, तोलाचे होते. श्रीराम जे बोलत होते ते करीत होते.

परीटाने पुन:पुन्हा रामाचे पाय धरले आणि दयेची भीक मागितनी. पण श्रीरामाच्या वचनांत फरक पडला नाही. त्यांनी अत्यंत प्रेमपुर्वक परीटाला परत पाठविले.

नंतर अत्यंत कृतनिश्चयाची गंभीर मुद्रा त्यांनी धारण केली. श्रीरामांनी मनाशी कांहीतरी ठरविले. गर्भवती-सीतेला घरात ठेवले तर होणाऱ्या संततीला दोष येईल. लोकांच्या जिभेला आवर घालणे हे केवळ यमराजालाच जमू शकते. राजाला नाही. लोकनिंदा ही दूषित हवेसारखी वातावरणात पसरते आणि अनेक चांगल्या चांगल्या शीलवंतांना, धर्मवंतांना आणि देशप्रेमीजनांना जगणे असहय होते. जीवनाचा आधार जेव्हा जनाश्रय असतो तेव्हा मोठयातील मोठया माणसांनी देखील लोकनिंदेची बूज बाळगली पाहिजे. ज्यांना लोकनिंदेचा अग्नि लागला नाही असे पुरुष केवळ विरळच.!

श्रीरामांनी आपल्या प्राणप्रिय भावाला आमंत्रण धाडून बोलावून घेतले आपले कृतनिश्च पार पाडण्याचे धैर्य श्रीलक्ष्मणाच्या ठिकाणीच आहे हे त्यांना ठाऊक होते. पण सीता-त्यागाची कठोर कल्पना लक्ष्मणाला सहन होणार नाही हेहि त्यांना ठाऊक होते. पण श्रीलक्ष्मणाच्या रामप्रेमा ची कल्पना श्रीरामाला होती. ह्रदय मोकळे करायला ज्यांना जागा नाही अशांनाच भाग्यहीन म्हट लेले आहे. श्रीरामाची आज्ञा मिळतांच लक्ष्मण तेथे आले. त्यांनी रामाच्या पायांना वंदन केले व काय आज्ञा श्रीराम देतात याची वाट पाहू लागले.

लक्ष्मणा! --राम कांही सांगणार पण त्यांच्या तोंडातून शब्द निघेना. काय भाऊराया, कसला विचार आपण करीत आहांत ? कुणी आपल्या मनाला वेदना होईल असे शब्द बोलला आहे काय? आपल्या चेहऱ्यावर हे चिंतेचे ढ ग कां गोळा झालेले आहेत? कोण आहे तो अधम पुरुष की ज्याने माझ्या आवडत्या रामाच्या ओठातील मंगलहास्य हिरावून घेतले आहे? श्रीरामा ह्रदयांतील वेदना जाणून घेण्यासाठीच मी आलो आहे ना! मग सांगत का नाहीत काय झाले आहे ते.

रामाने सेवकांना बाहेर घालवून दिले. एकांतातील खोलीत श्रीलक्ष्मणाला घेऊन ते गेले आणि मग शोकावेगाने त्यांनी लक्ष्मणाला ह्रदयाशी धरले. डोळ्यांतून अश्रु वाहु लागले. लक्ष्मण तर गोंधळून गेला. श्रीरामाला इतके दु:ख कां झाले आहें? सीताहरणाच्या वेळी देखील राम इतके खिन्न नव्हते. उलट आलेल्या या आपत्तीतून आपण सहीसलामत बाहेर पडू असा आत्मनिश्चय त्यांच्या मनांत होता. पण आज कांहीतरी भयंकरच घडले असले पाहिजे.

श्रीरामाचा दु:खावेग कमी झाल्यानंतर ते म्हणाले, लक्ष्मणा, माझे एक काम करणार ?

हे काय बंधुराया, आपल्या आज्ञेसाठीच माझे कान आतुर आहेत. आपली आज्ञा पालन करायचे सामर्थ्य माझ्याजवळ असावे एवढ ेच तर माझी नेहमी इच्छा असते. आपण सांगाल ते काम अवश्य करीन. नंतर श्रीराम अत्यंत विषण्ण होऊन म्हणाले, लक्ष्मणा, सीतेला घोर अशा अरण्यांत सोडून येशील?

भाऊराया, लक्ष्मण म्हणाला, आपल्या तोंडून हा प्रश्न ! लंकेवर स्वारी करुन सीतेला दास्यांतून विमुक्त करुन आणलं ते तिला पुन: वनवासाचं दु:ख द्यावं म्हणून ? आणि तिनं केलं तरी काय आहे, एव्ढी भयानक शिक्षा तिला द्यायला ? सीतेची कांही चूक झाली असेल तर माझे पंचप्राण छेदून टाका आपण. माझ्या देहांचे तुकडे तुकडे करा, पण तिला पुन्हां अरण्यांत--------

लक्ष्मणा, तू आत्ताच मला वचन दिले आहेस ना की तू मी सांगेन ते करीन. मग विलंब नको. तिला दिवस गेलेले आहेत. तीर्थयात्रेचे डोहाळे तिला लागले आहेत. त्या मिषाने तू तिला घेऊन जा. आणि तिला समजावून सांग की प्रजेच्या इच्छेखातर राम तुझा त्याग करीत आहे. रामाला सुखाने राहता येणार नाही असाच या रामधर्माचा इत्यर्थ आहे असे तिला सांग. वडिलांच्यासाठी राज्यत्याग, प्रजेसाठी सीतात्याग हे जणू त्याच्या नशीबीच लिहिलेले आहे. सीतेला अत्यंत प्रेमाने समजावून सांग. तिचा राम किती दु:खी आहे या निर्णयाने हे तिला कळू दे. हा निर्णय म्हणजे मी स्वींकारलेले हालाहाल विष आहे हे मी जाणतो. पण प्रजेच्या अनुरंजनासाठी हे करावेच लागणार आहे. माझ्या सीतेकडे बोट दाखवून तिला कलंकिनी-------

काय बोलता हे भाऊराया ? अशा जनतेची जिव्हा छाटून टाकण्याचे सामर्थ्य लोप पावले आहे काय आपल्या ठिकाणचे? राम-लक्ष्मणाचा दरारा इतका कमी झाला आहे काय की कुणीहि दोषारोप करावा? पण मला समजावून तरी सांगा की काय झाले आहे ते ? कुणी सीतामातेला वाईट म्हटले आहे?

मग अत्यंत शांत मनाने श्रीरामाने घडलेली सर्व हकिकत लक्ष्मणाला सांगितली. ती ऐकत असतां लक्ष्मणाचे रक्त तापत होते. श्रीरामासंबंधी व त्यांनी घेतलेल्या निर्णयासंबंधी त्याला अतोनात घृणा निर्माण झाली. मोठी माणसे फार मोठी असतात याची त्याला कीव आली. माणसांनी माणसासारखे असावे. क्रोधादिक भावविभाव जर समूळत: नष्ट झाले तर मानवसमाजाचा कणाच मोडून निघेल. दीन दुर्बलांचा वालीच उरणार नाही. क्षमा-शांति-तितिक्षा

हे शब्द फार मोठे खरे! पण दुष्ट माणसांनी या शब्दांचा फायदा घेऊन आमचा नाश करु नये ही काळजी नको का घ्यायला?

शेवटी लक्ष्मणाने केवळ श्रीरामाची आज्ञा म्हणूनच अत्यंत शोकखिन्न हृदयाने ही कामगिरी पार पाडण्याचे ठरविले. पण त्याचे मन म्हणत होते की हे प्रजानुरंजन घातकी आहे.

सीतेच्या तीर्थयात्रेची जय्यत तयारी करण्यांत आली. अयोध्येच्या सर्व मंदिरांतून पूजा-अभिषेक होऊ लागले. व्रतधारी लोकांना नित्य आहार, श्रावकांना चार प्रकारची दोन दिली गेली. गावातील सर्व प्रमुखांनीहि या कामी खूपच उत्साह दाखविला. पण रामाचे मन निरुत्साही होते, खिन्न होते.

सीतेला या प्रकारची गंधवार्ताहि नव्हती. तिला रामाने मोठे कौतुक वाटत होते. इतक्या प्रचंड प्रमाणावर तिचे डोहाळे पुरविले जातील याची तिला कल्पना नव्हती. ती सुखावली होती. श्रीरामासारखा पति आपणांस जन्मोजन्मी मिळावा अशी भावना तिच्या मनांत निर्माण झाली होती. तीर्थयात्रेसाठी सुंदर सुंदर रथ तयार करण्यांत आले होते. खूप रत्नालंकारांनी रथ सजविण्यात आले होते.

एका शुभमुहुर्तावर प्रयाण करायचे ठरले. लक्ष्मणाला बरोबर जाण्याची रामाज्ञा झाली. सीतेला जवळ घेऊन तीला आश्वस्त केले. ते म्हणाले, --- सीते, जीवन हे उत्कृष्ठ काव्यासारखे असते. कारुण्य हे महान काव्याचे आधारभूत तत्त्व असते. रामाचे व सीतेचेहि जीवन असेच आहे असे तू समज. जनकासारख्या आध्यात्म्याचे गाढ विद्वानाची तू कन्या आहेस. तुला सुखदु:खे समेकृत्वा राहण्याची सवय आहे. दु:खाला कर्माचा परिणाम मानून त्या दु:खाला सहन करण्याचे दिव्य सामर्थ्य तुला मिळाले आहे पण या रामाजवळ ते नाही. तो कधी पित्यासाठी, मातेसाठी, भावासाठी, पत्नीसाठी तर कधी प्रजेसाठी वेडा होतो. तुला सुख देण्याचा मी विचार केला की, दु:खच पदरी बांधून देण्याची पाळी येते. सीतेला हृदयाशी धरू न दोन अश्रु रामाने वाहीले. रामाची पूजा करण्याची पध्दतीच वेगळी.

सीतेने पतीला वंदन केले.  एका निष्पाप जीवाशी आपण किती क्रुर खेळ खे्ळत आहोत याची कल्पना मनाशी चाटून जाताच रामाचे ह्रदय भंगले.  विदीर्ण झाले.  कशातरीतां हा मायाचार ?  लोकानुरंजनासाठी?  काय साधणार आहोत आपण यामुळे?  -- असा विचार श्रीरामाच्या मनात मनांत आला.  पण रामाचा निर्णय हा अट ळ होता.  स्वत:च्या निर्णयाने इतरांच्या जीवाची जी ससेंहोळप्ट होते ते निर्णय घेणाऱ्यांच्या लक्षात कधीतरी येते का? स्वत:च्या मानसिक प्रक्रियेसाठी इतरांना दु:ख पोचविणे हे देखील पाप आहे.

श्रीरामाच्या आज्ञेप्रमाणे सीता तीर्थवंदनेला निघाली.  त्या रथाचे सारथ्य कृतांतवक्र करीत होता.  सीतेला मात्र अशुभ, अमंगल वाट त होते.  डोहाहे पूर्ण करण्याचे हे नाट क तर नाही ना ! सीतेच्या नजरेला नजर श्रीराम भिडवू शकले नव्हते तेव्हाच सीतेने ते ताडले होते.  पण पण कर्मगतीचा तीव्र प्रवाह मानवी जीवनाची हवी तशी वाताहत करीत असतो,  हे तिला ठाऊक होते.

रथाने अयोध्या सोडली.  सीतेने पाहिले की अयोध्यावाससियांच्या दृष्ट ीतहि कांही फरक पडला होता.  पूर्वीसारखे प्रेम त्यांच्या नजरेतून दृग्गोचर होत नव्हते.

समोगिरीसारख्या अत्यंत पवित्र तीर्थांचे दर्शन घडणार या विचाराने तिने बाकीचे सर्व कुविचार जिंकले होते.  अनेक योजने रथ चांलत गेला.  संध्याकाळ होण्याची वेळ आली.  तेंव्हा सिंहख नांवाच्या एका जंगलात कृतांतवक्राने रथ थांबविला व मग तो जोराने रडू लागला.  त्याचे ते रडणे ऐकून सीतादेवीनें विचारले,  अरे सारथ्या, तुला रडू कां येत आहे?  आपण तर तीर्थवंदनेंला चाललो आहोत आणि तू का रडत आहेस?  तेंव्हा कृतांतवक्र म्हणाला,  देवि, आपल्या पतिदेवाची अशी आज्ञा होती की आपणाला या अरण्यांत सोडून मी परत यावे.

अशि आज्ञा ते देतील असे मला वाट त नाही.  कारण श्रीरामाची कसलीहि आगळिक मी केली नाही.  माझ्याकडून कांही चूक झाली असती आणि मी देखील ते सांगतील ती शिक्षा भोगली असती.  पण------सीता म्हणाली.

देवि, कृतांतवक्र म्हणाला, मला यातील कांही ठाऊक नाही पण असे ऐकतो की जनापवाद असा होता की सीता ही रावणाकडे होती. रावणाची अमंगळ दृष्ट ी आपल्यावर पडली असणार ? प्रजेची अशी इच्छा होती की श्रीरामाने सीतेला अयोध्येत ठेवू नये. तिच्या शीलासंबंधाने प्रजेला शंका आहे------ कृतांतवक्राने सीतेच्या वर्मी घाव घातला होता. ते अत्यंत अप्रिय वचन सीतेच्या ह्रदयांत खंजिराप्रमाणे रुतले. सीतेच्या शीलासंबंधी ज्यांना शंका आहे तिथे राहण्यापेक्षा मृत्यु काय आहे? ज्या तत्वाच्या आधाराने स्त्रीच्या कोमल भावनांची गुंफण झ ालेली असते तो आधारच नष्ट झाल्यावर स्त्रीने काय करावे?

वनवासापेक्षां, शरीरिक भयंकर पीडापेक्षा स्वत:च्या शीलाची लोकाना, प्रत्यक्ष रामाला शंका यावी ना ! सीतेचया शीलाच्या सत्वापेक्षा राज्याचा लोभ श्रीरामांना वाट ावा ना ! लक्ष्मणा, म्हणूनच तू आला नाहीस ना ! श्रीरामाची आज्ञा तू ट ाळू शकलास परंतु या तुझ्या भावजयीचे दु:ख तू ट ाळू शकला नाहीस. वनवासांत मी तुझ्या आधारावरच किती विसंबून होते. पण आज मी एकाकी आहे. माझी विपन्नावस्था पाहून हया वृक्षलताहि रडतील पण मानवांना पाझर फुट णार नाही. श्रीरामा, राज्याच्या लोभासाठी तुम्ही हे करणार नाही? मग हे घडले कसे? प्रजेच्या अनुरंजनासाठी आपण करीत असाल तर मत्र मी पोरकी झाले आहे.

असे म्हणत असता सीता मूर्च्छित होऊन जमीनीवर कोसळ्ली. कृतांतवक्र सेनापतीलाहे सारे दृश्य पाहून कसेसेच वाट ले. केवळ रामाची आज्ञा म्हणूनच तो सीतेला या मृत्यच्या जबडयात सोडून जाण्यासाठी आला होता. किती भयंकर कार्य आपण अंगीकारले होते याची त्याला जाणीव झाली. पतित्यक्त स्त्रियांच्या जीवनाची जबाबदारी या रानातील सिंहदिक हिंस्त्र पशूंनी पत्करायची काय? की रानावनातील चोर, डाकू, यांच्या हवाली ही स्त्रीरत्ने करावयाची ? ज्या समाजाची स्त्री संबधाने हीच धारण असेल त्या समाजाने सुसंस्कृतपणाची आशा तरी का करावी? परित्यक्त स्त्री कुणाची तरी कन्या असणार ? कुणाची तरी सून असणार ? प्रमाद घडला तर त्याचे प्रायश्चित देण्याचे काम पापाचरणी मानवांची कां म्हणून करायचे?

सीतादेवी शुध्दीवर आली. भावातिरेकामुळे तिने या स्त्री-त्यागाची जबाबदारी रामावर ट ाकली होती. परंतु तिचे मन शांत झाले. ती कृतांतवक्राला म्हणाली, श्रीरामांना माझा निरोप सांग की सीता ही स्त्री आहे. तिला घरांतून काढ ून देणे सोपे आहे. तिची दुष्कीर्ति जगभर झ ाालेली तुम्हाला ऐकावीच लागेल. अयोध्यावासियांच्या मताग्रहाने आपण माझा त्याग केला. आपल्या हृदयाच्या वेदना मी जाणू शकते. परंतु माझी एक विनंती आहे की लोकांच्या अनुरंजनासाठी माणुसकीचा आपण त्याग करु नये. करुण्य ज्याचा आत्मा आहे, विवेक ज्याचे नेत्र आहेत, सम्यक् श्रध्दा ज्याचे ह,दय आहे अशा जैनधर्माचा आपण त्याग करु नये. मांगल्यावर आपली श्रध्दा असावी. व ही श्रध्दा जन्मांतीही विचलीत होणार नाही अशी आपली मानसिक तयारी असावी अशी माझी अग्राहाची विनंती आहे. माझी विनंती श्रीरामाच्या कानी घाल. कृतांतवक्रा, हे दागिने, ही आभुषणे घे. तू पार पाडलेल्या कामगिरीबद्दल मी तुला ती अर्पण करीत आहे.

सीतेच्या या उद्गाराने कृतांतवक्राला अत्यंत वाईट वाट ले. त्यानंतर सीता म्हणाली, कृतांतवक्रा, सूर्य मावळत आहे. तुला वेळ होईल. तू जा आता. सीतेची काळजी करु नकोस. असली भयानक अरण्ये मी गेली चौदा वर्षे पाहिली आहेत. त्याचे मला भय नाही. या वनांत राहणाऱ्या प्राण्यांचे मला भय नाही. भय आहे ते केवळ सुसंस्कृत म्हणविणाऱ्या मानवजातीचे.

असे म्हणून सीता त्या बिकट अरण्यांत चालत चालत अद्श्य झाली.

काळालाहि लाजविल असा कृतांतवक्र सेनापति एखादया बालकाप्रमाणे रडत होता. असामान्य आत्म्याचे दर्शन त्याला घडले होते. एका स्त्रीच्या ठिकाणची ही दैदिप्यमानता कुठे आणि संस्कृतीच्या थोरवीचा डिंगोरा पिट णारे क्षुद्र मानव कुठे !

सीतादेवी त्या अरण्यांत अत्यंत शांतपणे राहिल्या. सांसारिक दु:खे भोगूनच त्या दु:खाचा नाश होतो. हाच भोग होय. चंदनाचा सुगंध झिजतांना अधिक सुखकारक वाट तो. दु:खजयाने

आत्म्याचे बळ वद्ध ीस लागते याचा प्रत्यय सीतेला अनेकदा आला होता. आत्मयविजयाचा मार्ग म्हणजे शरीर विजय. त्या शरीराच्या गरजांवर आत्म्याचे नियंत्रण आले की आत्मा बलवान होतो.

जिनेश्वराचे मंगलमय नामाचा उच्चार करीत ती तेथे राहिली. एके दिवशी वज्रजंघ नांवाचा राजा आपल्या सैन्यासह चालला असतां सीतेची व त्याची भेट झाली. इतकी सुंदर स्त्री आणि अरण्यांत कशी त्याने तीची चौकशी केली. अजाणताच त्याच्या मनांत सीतेविषयी प्रेम वाट ू लागले. मागील जन्माचे कांही ऋणानुबंध असल्याचे त्याला वाट ले. ही आपली बहीण आहे अशी भावना त्याच्या हृदयात दृढ झाली. तो म्हणाला, हे सीते, तुझ्या दर्शनाने माझ्या मनांत स्नेहभाव निर्माण झाला आहे. एवढ ग्र पराक्रमी राजाची तू पत्नी, जनकासारख्या तप:पूत राजाची तू कन्या, लक्ष्मणासारख्या सामर्थ्यवानाची तू भावजयी आणि हनुमानादिक विद्याधरांची तू पूज्य विभूति आहेस, हे ऐकून तर माझाहि विश्वास दुणावला आहे. आम्ही आमच्या पुंडरिकपुराला निघालो आहेत. आमची वंदनपुर्वक विनंती आहे की आपल्यासारख्यांचे पाय आमच्या नगरीला लागावेत व ती पुनीत व्हावी. आपणासारख्या वंदनीय व्यक्त ींच्या सेवेची संधि मिळाली तर मी व आमची प्रजा स्वत:ला भाग्यवान समजू.

वज्रसंघाने फारच आग्रह केला. तो आग्रह सीतेला मोडता येईना. ती त्याच्याबरोबर जायला तयार झाली. सर्व सैन्याने सीतामातेचा जयजयकार केला. सीतेच्या उदरांतील बालकांच्या पुण्यप्रतापानेच जणू कांही ही अवस्था तिला पुन: प्राप्त झाली.

वाट ेत अनेक समंतांनी वंदनीय सीतामातेचाआदरसत्कार केला. अनेक तऱ्हे नजराणे तिला अर्पण केले. ते सर्व नजराणे सीतेने जिनमंदिराच्या निर्मितीसाठी पुन: देऊनट ाकले.

सीतेच्या आगमनाची वार्ता पुण्डरिकपुरात अगोदरच पोंचली होती. सारे शहर सुशोभित झाले होते. ज्या सीतेची किर्ती सर्व भारतभर पसरली होती ती नगरात येणार म्हणून सारी जनता तिला पाहण्यास उत्सुक झाली होती.

पतीने ट ाकलेल्या स्त्रीला मात्र ह्रदयांतून अनंत वेदना होत होत्या. कुठें ते राजवैभव आणि कुठे की लाजिरवाणी परित्यवंत अवस्था! सीतेसारख्या असाधारण स्त्रीच्या जीवनाची ही विपन्नावस्था खरोखर आपल्या या जीवनावर मागील जीवनांतील शुभाशुभ कर्मांचा इतका परीणाम होत असेल असे वाट त सुध्दा नाही. जीवनाला प्राप्त होणारी ही वैधवावस्था ही देखील कर्मजन्यच होय. वैभव, सामर्थ्य आणि धनसंपत्ती यांचाहि उद्गम कर्म परिणामांतूनच होतो. ज्यांचे कर्म बलवत्तर त्याला भयानक अरण्यांतहि मित्र मिळतात. व ज्यांचे दुर्दिन जवळ आले आहेत त्याला त्रैलोक्याचे राज्य मिळाले तरी त्याचा उपभोग घेता येत नाही. म्हणूनच जीवनाची सार्थकता ही सुखदु:खे जिंकून विवेक आणि संयम यांना प्रधान अंगे मानून आत्मनिष्ठ होण्यांत आहे. अमरत्वाचा साक्षात्कार आत्मनिष्ठ झाल्याशिवाय होत नाही.

सीतादेवीच्या पूर्वोपार्जित कांही अशुभ कर्मोदयामुळे पतितेचं जीवन उपभोगायला मिळालं. पण ती खचली नाही. शोक, संताप आणि मानसिक अस्वस्थता निर्माण होणे अपरिहार्य असले तरी त्यांतून तिने मार्ग काढ ला.

थोडया वेळाने तिचा रथ पुंडरिकपुरास आला. नगारे, दुंदुभि, तुताऱ्या आणि शंखानाद यांच्या आवाजाने सर्व आकाश भरुन गेले. घरांघरावर तोरणे, गुढ्या, ध्वज-पताका उभारलेल्या होत्या. सीतामातेचा जयजयकार होत होता. सीता वज्रजंघाकडे का आली याचे मात्र नगरवासियांना कोडे होते!

सीतेला निबिडतर अरण्यांत सोडून निघून गेलेला कृतांतवक्र सेनापति श्रीरामाकडे गेला. त्याने सर्व वार्ता त्यांच्या कानी घातली. श्रीरामाच्या नेत्रातून अश्रु वाहू लागले. सीतेचा संदेशहि त्यांने सांगितला. सर्व सोडून दिले तरी सम्यक् दर्शनाची, डोळसपणे आत्मनिष्ठ होण्याची प्रवृत्ती सोडू नकोस. हा तिचा महत्वाचा संदेश ऐकला तेंव्हा त्यांना खूपच वाईट वाट ले. अध्यात्मकन्या सीतामातेचा त्याग करण्यांत आपण फार मोठे औचित्यपूर्ण कृत्य केले आहे याची साक्ष मन देईना.

सीतेची पुन:पुन: आठवण करुन एखाद्या लहान मुलाप्रमाणे राम विलाप करीत. सुखशय्येचा त्यांनी त्याग केला. मधुर व सुस्वादु भोजनाचा त्यांनी त्याग केला. राज्यकारभरांतहि त्यांचे लक्ष राहिले नाही.

एके दिवशी लक्ष्मणाने आपल्या अवडत्या श्रीरामाची समजूत काढली. तो म्हणाला, श्रीरामा, सीतेचा त्याग केल्यामुळे एक नवा आदर्श आपण समाजापुढे ठेवला असे आपणांस वाटते. पण यापुढे स्त्रीयांच्या दु:खांत भरांत भर म्हणून पतितेचं जीवन जगावं लागेल. रामासारख्याने त्याग केला तर जनसामान्याला तेच करावं लागेल. आणि मग केवळ संशयाने चांगल्या चांगल्या स्त्रियांच्या संसाराची, जीवनाची वाताहत होईल. अशा परित्यक्त स्त्रियांची जीवने असहाय्य व दीन झाली की कावळे व गिधाडे ज्याप्रमाणे प्रेतावर तुटून पडतात त्याप्रमाणे समाजसंकटांच्या पापी नजरा आणि अधम हात अशा स्त्रियांवर पडतील समाजाला एका नवीन रोगाची लागण तुम्ही दिली आहे. स्त्रीचे पाऊल चुकले तर तिचा सुधारणेची किंवा चुकीची जबाबदारी तिच्या पतीवर नाही काय? शरीरांत रोग निर्माण झाला तर त्याच्यावर औषधोपचार करायचा की त्याच्या नशिबावर त्याला सोडून द्यायचे. मानवाच्या दृष्टिकोनातून जोपर्यंत सामाजिक प्रश्न सोडविले जाणार नाहीत तोपर्यंत मानवजात दु:खी राहील. मानवांनी स्वत:भोवती देश, धर्म, जाती-रिवाजांची जी बंधने घालून घेतली आहेत ती परिवर्तनीय आहेत. त्या बंधनांपेक्षां मानवाची जीवने श्रेष्ठ आहेत. हे श्रीरामा, आपण राज्यकारभार करीत आहोत याचा अर्थंच ही अगदी कृत्रिम गोष्ट आहे. मानवांच्या दु:खस जर राज्यकारभार कारणीभूत होत असेल तर ती राज्य-व्यवस्था नाकारुन किंवा नवी राज्य-व्यवस्था अंमलांत आणली पाहिजे.

श्रीराम हृदयांतून अस्वस्थ होते. सर्वस्वाचा होम केला तरी जनसामान्यांचे अनुरंजन शक्य नाही. अनुरंजनाचा मार्ग त्याज्यच होय. अशी त्यांची मनोमन खात्री झाली होती. निर्भयपण व स्वतंत्रपण निर्णय घेण्याची शक्ति राज्यकर्त्यातून कमी झाली की मानसिक गुलामी प्राप्त होते. हे श्रीरामाला कळत नव्हते असे नाही. पण घेतलेला निर्णय आता फिरविणे शक्य नव्हते. सीता-विरहापेक्षां सीता-त्यागाचे दु:ख थोर होते. आयुष्यांत घडलेली ती महान चुक होती.

त्यावेळी श्रीरामाला जटायुची आठवण झाली. आपल्या सर्व सामर्थ्यानिशी परस्त्री हरणाऱ्यावर तुटून पडणार तो पक्षिराज कुणीकडे आणि परस्त्री-हरणाची संधी आपण होऊन उपलब्ध करुन देणारे राज्यकर्ते कुणीकडे ! जटायुचे बोल रामाच्या कानांत घुमू लागले. तो म्हणाला होता--- स्त्रीवर आक्रमण होणार नाही अशी मानवांची मते बनतील तो मानवसमाज प्रगत म्हणविला जाईल. वैभवाच्या, सामर्थ्याच्या आणि राज्य-नियमांच्या मार्गानी स्त्रीला गृहत्याग करायला लावणारी मानवजात नेंहमीच असंस्कृत राहिल. रामा, तुझ्या राज्यांत प्रतिष्ठा वाढेल, स्त्रीधर्म वंदनीय ठरेल अशी मी अपेक्षा करतो. हे त्या पक्षाचे बोल होते. मानवी जीवनाला समृध्द करणाऱ्या स्त्री-जातीचा जेंव्हा छळ मांडला जातो त्यावेळी विनाश फार दुर नसतो.

रामाच्या-हृदयव्यथेला सीमा नव्हती. पण आता घडणारे घडून गेले होते. केवळ स्मृतिशिवाय श्रीरामाजवळ काय होते?

लक्ष्मणा, तू माझ्या संनिध राहा. माझे सर्वस्व म्हणजे आता तूच. तुझ्या वेदना जाणून न घेता मी तुला वनवास घडविला. तिथेही तुला सुख मिळाले नाही. आता सीता-त्यागाच्या माझ्या दु:खातहि तूच सांगाती. तुझ्या जीवनांत अकारण दु:ख-संभवाला मीच कारण आहे. लक्ष्मणा, कां तू माझ्याजवळ आहेस? मी तुझा थोरला भाऊ शोभत नाही. तुझ्या सुखासाठी मी काय केले? तूही मला सोडून कां जात नाहीस ? वडील, आई, भाऊ आणि पत्नी यापैंकी मी कुणालाच सुखी करु शकलो नाही. जनतेला खूष करण्याच्या प्रयत्नांत मी माझे सुख, माझे श्रेय, हरवून बसलो नाही ना? लक्ष्मणा, तूहि सोडून जा मला. तुझ्या या दुष्ट रामाला वियोगाच्या विरहाच्या अग्नीत जळू दे. असंख्य विजांच्या शय्येवर मला फेकून देऊन तुहि निघून जा. असे म्हणत श्रीराम पुनश्च विलाप करु लागले. श्रीरामाच्या नेत्रांतून अविरतपणे अश्रु वाहू लागले.

श्रीलक्ष्मणाने त्यांना जवळ घेतले, कुरवाळले----अश्रु पुसले. मातेची ममता आणि बंधुभाव यांनी त्यांचा शोक त्यांनी आवरुन धरला. विरही श्रीरामाची व्यथाकथन करायला कोण समर्थ आहे?

सीतेच्या उदरातील श्रीरामाचा गर्भ वाढू लागला. अयोध्यावासियांनी पावित्र्याची केलेली विटंबना आठवून ती दु:खी होई. ज्या जनतेला स्वत:चे हित कळत नाही तिचे अनुरंजन करीत `राजा` म्हणून घेण्यापेक्षा हिंस्त्रपशुच्या सान्निध्यात राहणे काय वाईट ! पण श्रीरामाच्या `विवेकाला` अविचार कसे म्हणावे? श्रीरामाच्या कृतीला नांवे कशी ठेवावीत? या विचाराने ती पुन:शांत होई.